# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. संजाबराव तारूबा गवई वय ४२ वर्ष पद कृषी सहायक, मुख्यालय काझेगाव प्रभार मडाखेड |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | एकुण २०,०००/— रूपये त्यापैकी १०००० हजार रूपयाचा पहीला हप्ता म्हणून तात्काळ मागीतले |
| घटनास्थळ | तालुका कृषी विभाग कार्यालय, समोरील चहाची टपरी, जळगाव जामोद |
| घटना तारीख | २१.०७.२०२० |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तक्रारदार यांनी त्यांचे शेतात कृषी योजनेतून केलेल्या शेततळ्याचे अनुदानाचे बिल काढून देण्याचे मोबदल्यात आलोसे श्री संजाबराव तारूबा गवई वय ४२ वर्ष पद कृषी सहायक मुख्यालय काझेगाव प्रभार मडाखेड ता. जळगांव जामोद जि.बुलडाणा हे २०,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार दिनांक २०.०७.२०२० रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो बूलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक २१.०७.२०२० रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक श्री संजाबराव तारूबा गवई, कृषी सहायक मुख्यालय काझेगाव प्रभार मडाखेड ता. जळगांव जामोद यांनी तक्रारदार त्यांचे शेतात कृषी योजनेतून केलेल्या शेततळ्याचे बिल काढून देण्याचे मोबदल्यात पंच क्रमाक १ यांचे समक्ष एकुण २०,०००/— रूपये लाचेची मागणी केली व त्यापैकी पहीला हप्ता म्हणून १०००० /— रूपये लाच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने दि.२१०७.२०२० रोजी व दि.२२.०७.२०२० दिनांक २४.०७.२०२० रोजी रितसर सापळा कार्यवाही आयोजित केली असता लोकसेवक आलोसे श्री संजाबराव तारूबा गवई यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांचेकडून पैसे घेण्यास टाळाटाळ करुन लोकसेवक श्री संजाबराव तारूबा गवई वय ४२ वर्ष पद कृषी सहायक मुख्यालय काझेगाव प्रभार मडाखेड ता. जळगांव जामोद यांनी आपले लोकसेवक पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैश्याचे स्वरुपातील अर्थिक लाभ मिळविण्याचा प्रयत्न करुन आपले लोकसेवक पदाला न शोभनारे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द कलम ७ लाच लुचपत प्रतीबंधक कायदा संशोधन २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही :— १. मा. श्री. श्रीकांत धिवरे पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. पंजाबराव डोंगरदिवे अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
३. मा. श्री. मळघणे, पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.

यांचें मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोनि. श्रीमती अर्चना जाधव व सापळा पथकातील स्टाफ , पोना रविंद्र दळवी, पोकॉ विनोद लोखंडे, पोकॉ अझरोदीन काझी व चालक पोकॉ शेख आर्शद यांनी पार पाडली..

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व ९८५०७९२६९६ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

(श्रीमती ए. एन. जाधव )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner